**वाचले :-** १) शासन निर्णय क्रमांक : घभाभ-१०१५/प्र.क्र.१९/सेवा-५दिनांक १६/१२/२०१६

२) आदेश क्रमांक लेखा/३/कावि/१३३/२०२० दिनांक १८/०५/२०२०

३) शासन निर्णय क्रमांक घभाभ -२०१९ /प्र.क्र.२/सेवा -५ दि.५/०२/२०१९

४) आदेश क्रमांक लेखा/ १अ/कावि/७४० /२०२१दिनांक २७/०७/२०२१

५) पिंपरी चिंचवड महानगरपालिका कर्मचारी महासंघ यांचे पत्र दि.१२/८/२०२१

६) मा.आयुक्त यांचेकडील दिनांक१९/११ / २०२१ चा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -१८. लेखा विभाग
क्र. लेखा/१अ/कावि/११९२/२०२१
दिनांक :- १९ /११/२०२१

**विषय :- सुधारीत दराने घरभाडे भत्ता मंजूर करणेबाबत ...**

**आदेश,**

उपरोक्त क्रमांक १ चे शासन निर्णयानुसार पिंपरी चिंचवड शहराचा एक्स वर्ग शहरामध्ये समावेश केलेला आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कर्मचा-यांना उपरोक्त क्रमांक २ चे आदेशानुसार दिनांक १/१/२०१६ पासुन ७ वा वेतन आयोग लागू करण्यात आला आहे. उपरोक्त क्रमांक ३ चे शासन निर्णयानुसार ७ व्या वेतन आयोगानुसार अनुज्ञेय केलेला महागाई भत्ता २५ टक्क्याची मर्यादा ओलांडेल त्यावेळी एक्स शहरासाठी २७ टक्के घरभाडे भत्ता मंजुर करण्यात यावा असे निर्देश आहे.

पिं.चिं.म.न.पा.कर्मचाऱ्यांना केंद्रीय कर्मचाऱ्यांप्रमाणे महागाई भत्ता लागू करण्याचे धोरण आहे. त्यानुसार उपरोक्त क्रमांक ४ च्या आदेशानुसार पिं.चिं.म.न.पा.कर्मचाऱ्यांना दिनांक १ जुलै २०२१ पासुन १७ टक्के वरून २८ टक्के महागाई भत्ता वाढविण्यात आला आहे. कर्मचारी महासंघाने वाचले क्रमांक ५चे पत्रानुसार वाढीव घरभाडे भत्ता मंजुर करण्याची मागणी केली आहे.

सबब, उपरोक्त वाचले क्रमांक ३ चे शासन निर्णयानुसार पिं.चिं.मनपा. कर्मचा ऱ्यांना दिनांक १ जुलै २०२१ पासुन घरभाडे भत्याचा दर २४ टक्के वरून २७ टक्के प्रमाणे लागू करण्यात येत आहे. नोव्हेंबर २०२१ चे वेतन सुधारीत घरभाडे विचारात घेऊन तसेच माहे जुलै २०२१ ते ऑक्टोंबर २०२१ पर्यंतची घरभाडे भत्त्याची थकबाकी माहे नोव्हेंबर २०२१ चे वेतन देयकात अदा करण्यात यावी.

१७/११/२१

( राजेश पाटील )
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी -१८

प्रति,

**सर्व संबंधित शाखाप्रमुख**

प्रत :-

मुख्य माहीती व तंत्रज्ञान अधिकारी

२/- वरील आदेशानुसार पगार बिलांमध्ये आवश्यक ते बदल करण्यात यावेत.

( जितेंद्र कोळंबे )
**मुख्य लेखा व वित्त अधिकारी**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८